**<u>फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन</u>**

**<u>भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०६ ची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः नितेश नामदेव जाधव,

वयः ३३ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः धनगरआळी, रोहा, ता.रोहा, जि.रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :</u>**

०१. दि.२५/११/२०१९ रोजी मी बाजारात होतो. त्यावेळी रोशन चाफेकर याने मला फोन करुन गाई टेम्पोमध्ये भरुन घेवून जात असल्याची माहिती दिली. त्यावेळी अंकित मोहिते माझेसोबत होता. मी व तो मिळून हनुमान टेकडी, रोहा येथे गेलो. आम्ही पिकअप वाहन नोंदणी क्र.एम.एच–०६/बी.जी ३८८५ हनुमान टेकडी जवळ अडवीली. त्यामध्ये दानिष खान व इतर दोन व्यक्ती होते. आम्ही त्याला गाडी कुठे घेवून जात आहेस, असे विचारले असता त्याने आम्हाला बरोबर उत्तर दिले नाही. त्यावरुन आम्ही सदर गाडीची पहाणी केली असता आम्हाला त्यामध्ये दोन गाई व दोन कालवडी मागचे बाजूला दिसल्या. त्यागाडीमध्ये जनावरांना खाण्याकरीता कुठलीही व्यवस्था नव्हती. नंतर आम्ही दानिष खानला गाडी पोलीस स्टेशन, रोहा येथे घेण्याचे सांगीतले. त्यावरुन आम्ही पोलिस स्टेशन, रोहा येथे आलो. त्यावेळी पोलिसांनी देखील दानिष खान कडे जनावरांच्या अनुषंगाने विचारणा केली असता त्याला सांगता आले नाही. पोलीसांना त्याचेकडे परवाना देखील मिळाला नाही.

०२. त्यानंतर घटनेचे अनुषंगाने अंकित मोहिते याने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. पोलीसांनी घटनेच्या अनुषंगाने माझी विचारपूस केली होती व माझे बयाण नोंदविले होते. दानिष खान आज न्यायालयात हजर असून आरोपीचे पिंज–यात बसलेला आहे. मी केवळ त्याला एकटयाला ओळखतो. इतर इसमांचे चेहरे माझे लक्षात नाही.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. डी. एम. वर्मा यांच्यामार्फत सुरू.**

०३. पोलिसांनी माझे बयाण दि.२५/११/२०१९ रोजीच नोंदविली होते. पोलीसांनी माझे बयाण मी सांगीतल्या प्रमाणे नोंदविले होते. मी पोलीसांना बयाण देतेवेळी रोशन चाफेकर याने मला फोन करुन गाई टेम्पोमध्ये भरुन घेवून जात असल्याची माहिती दिली होती, आम्ही पिकअप वाहन नोंदणी क्र.एम.एच–०६/बी.जी ३८८५ हनुमान टेकडी जवळ अडवीली, आम्ही त्याला गाडी कुठे घेवून जात आहेस, असे विचारले असता त्याने आम्हाला बरोबर उत्तर दिले नाही, आम्ही सदर गाडीची पहाणी केली असता आम्हाला त्यामध्ये दोन गाई व दोन कालवडी मागचे बाजूला दिसल्या, हया बाबी सांगीतल्या होत्या, परंतु सदर बाबी पोलीसांनी माझे बयाणामध्ये का नमुद केलया नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

०४. मी पोक्सो कंपनी मध्ये नोकरी करतो. सदर कंपनी रोहा शहरापासून ४५ कि.मी. अंतरावर आहे. मी तेथे आळीपाळीने तीन्ही शिफ्ट मध्ये काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५/११/२०१९ रोजी माझी कंपनीमध्ये दुपारची शिफ्ट होती.

०५.　　हे म्हणणे खरे नाही की, दि.२५/११/२०१९ रोजी मी बाजारात होतो. त्यावेळी रोशन चाफेकर याने मला फोन करुन गाई टेम्पोमध्ये भरुन घेवून जात असल्याची माहिती दिली नव्हती, त्यावेळी अंकित मोहिते माझेसोबत नव्हता, मी व तो मिळून हनुमान टेकडी, रोहा येथे गेलो नव्हतो, आम्ही पिकअप वाहन नोंदणी क्र.एम.एच–०६/बी.जी ३८८५ हनुमान टेकडी जवळ अडवीली नव्हती, त्यामध्ये दानिष खान व इतर दोन व्यक्ती नव्हते, आम्ही त्याला गाडी कुठे घेवून जात आहेस, असे विचारले नव्हते व त्याने आम्हाला उत्तर दिले नव्हते, त्यावरुन आम्ही सदर गाडीची पहाणी केली असता आम्हाला त्यामध्ये दोन गाई व दोन कालवडी मागचे बाजूला दिसल्या नव्हत्या, नंतर आम्ही दानिष खानला गाडी पोलीस स्टेशन, रोहा येथे घेण्याचे सांगीतले नव्हते, त्यावरुन आम्ही पोलिस स्टेशन, रोहा येथे आलो नव्हतो.

०६.　　हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे बयाण नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी दानिष खानला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे आहे की, रोशन चाफेकर हा माझा चांगला मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याचे सांगण्यावरुन मी आज न्यायालयात साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.　　श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE　Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE Date: 2024.04.23 18:23:29 +0530

स्थळ : रोहा.　　(एस. एस. महाले)
दि.२३.०४.२०२४.　　न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.